SMART नागपूर | शुक्रवार, १४ फेब्रुवारी २०२०

पुण्य नगरी ७

# रमण नवप्रवर्तन महोत्सवाचा वार्षिक कार्यक्रम

नागपूर : रमण विज्ञान केंद्राच्या नवप्रवर्तन वार्षिक कार्यक्रमांतर्गत १३ ते १५ फेब्रुवारीपर्यंत रमण नवप्रवर्तन महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. यावेळी विद्यार्थ्यांसाठी अभिनव प्रकल्प स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. यावेळी शाळा, कॉलेजमधील विज्ञान व अभियांत्रिकीचे २०० विद्यार्थी ८० मॉडेल्स तयार करतील. स्टार्टअप अभियानांतर्गत विविध कारागिरांद्वारे तयार केलेल्या कलाकृती ठेवण्यात येणार आहे. या सोबतच छोट्या कागदाचे फूल यावर कार्यशाळा होणार आहे. पहिल्या दिवसाचे उद्घाटन सकाळी ११ वाजता प्रियदर्शनी इंजिनीअरिंग कॉलेजचे प्राचार्य विवेक नानोटी यांच्या हस्ते होणार आहे. महोत्सवात येणाऱ्यांसाठी प्रवेश निःशुल्क ठेवण्यात आला आहे.